जाक्र. जिपऔ/१-प्रशासन/साप्रवि/२०२०/कावि/१०९/ १०९९
कार्यालय जिल्हा परिषद औरंगाबाद
दिनांक ०९ मार्च २०२०

प्रति,

अनुकंपा उमेदवार सेवाज्येष्ठता
अ.क्र. १ ते ५०

**विषय :-** अनुकंपातत्वावर नियुक्तीसाठी मूळ कागदपत्र तपासणी बाबत.

**संदर्भ :-१.** उप सचिव, महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग, यांचे पत्र क्र.संकीर्ण २०१८/प्र.क्र.१७३/आरथा८ दिनांक ०५ फेब्रुवारी २०२०
२. या कार्यालयाचे अंतिम अनुकंपा ज्येष्ठता सूची दिनांक २९.१२.२०१८

उपरोक्त विषयी सूचित करण्यात येते की, शासनाचे संदर्भिय पत्रान्वये अनूकंपा पदभरतीबाबत सुधारीत सूचना प्राप्त आहेत. त्याअनुषंगाने संदर्भ २ नुसार प्रसिध्द करण्यात आलेल्या अनुकंपा सर्वसाधारण सेवाज्येष्ठता यादीतील पात्र उमेदवारांना त्यांचे शैक्षणिक अर्हता व प्रवर्गानुसार गट-क व गट-ड मधील रिक्त पदांवर नियुक्ती देण्याचे प्रस्तावित आहे.

अनूकंपा तत्वावर नियुक्ती देणेपुर्वी सेवाज्येष्ठता यादीतील उमेदवारांच्या शैक्षणिक व नियुक्ती करिता आवश्यक बाबींची त्यांच्या मूळ कागदपत्रावरून तपासणी करणे आवश्यक असल्यामुळे दिनांक १२.०३.२०२० रोजी स्व. यशवंतराव चव्हाण, सभागृह, जिल्हा परिषद औरंगाबाद येथे सकाळी ११.०० वा. तपासणीचा कॅम्प आयोजित करण्यात आलेला आहे.

तरी आपण आपले शैक्षणिक अर्हता, जात प्रवर्ग, गटविकास अधिकारी यांचा गृहभेट तपासणी अहवाल, मूळ कागदपत्रे तसेच मूळ कागदपत्रांच्या छायाकिंत प्रती सह वर नमूद ठिकाणी उपस्थित रहावे.

**शिरीष द बनसोडे**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)**
जिल्हा परिषद औरंगाबाद

**प्रतिलिपी :-**

०१. गट विकास अधिकारी, सर्व पंचायत समिती, अंतर्गत जिल्हा परिषद औरंगाबाद यांना देवून सूचित करण्यात येते की, संदर्भिय अनुकंपा ज्येष्ठता सूचीतील आपले पंचायत समिती अंतर्गत सर्व उमेदवारांचे प्रत्यक्ष गृह भेट घेवून तपासणी अहवाल तात्काळ गोपनीयरित्या सामान्य प्रशासन विभाग येथे सादर करावा. तसेच सदर प्रकरणात दिरंगाई होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**शिरीष द बनसोडे**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)**
जिल्हा परिषद औरंगाबाद